महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(२)(२)/२०२०/२३ दिनांक : १ डिसेंबर, २०२२.

**-: प्रसिद्धीपत्रक :-**

**विषय :- <u>महाराष्ट्र दुय्यम सेवा, अराजपत्रित गट-ब मुख्य परीक्षा - २०२०</u>**
राज्य कर निरीक्षक संवर्गाचा अंतिम निकाल
**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक २६१/२०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ११ सप्टेंबर, २०२० व दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट - ब मुख्य परीक्षा - २०२० या परीक्षेतील राज्य कर निरीक्षक संवर्गाच्या एकूण ८९ पदांचा अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये श्री. शुभम प्रतापराव पाचंग्रीकर, बैठक क्रमांक AU001173 हे राज्यात प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून श्रीमती प्रिया भरत मचे, बैठक क्रमांक AU001167 ह्या राज्यात प्रथम आल्या आहेत. मागासवर्गवारीतून श्री. सागर शांताराम आव्हाड, बैठक क्रमांक PN 002115 हे राज्यात प्रथम आले आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत परीक्षेचा अंतिम निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवारांचे गुण (Cut-off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

४. मूळ अर्ज क्रमांक १०५५/२०२१ व ६४/२०२२ वरील मा. न्यायाधिकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून अनाथ प्रवर्गाचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे.

५. प्रस्तुत निकालात नमुद केलेल्या सर्व शिफारसपात्र उमेदवारांच्या शिफारशी, त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पदासाठीची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरून तपासण्याच्या तसेच आरक्षणाचे दावे/प्रमाणपत्रे विहित प्राधिकरणाकडून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास, शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शिफारस करण्यात येत आहे. यास्तव ती प्रमाणपत्र सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/ १६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील बाब क्रमांक (६) नुसार नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची देखील वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करुन घेण्यात येईल. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र.अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavalambancard.gov.in अथवा SADM या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात

आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. त्यानुसार उमेदवारांच्या दिव्यांगत्वाच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्यात येईल. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या आधारे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तींच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

७. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

८. प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

ठिकाण : मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.